# छंद पुष्परचनेचा - २१

मागील लेखात बेसिक वेस्टर्न पद्धतीची त्रिकोणी रचना आपण बघितली. यावेळी आणखी काही प्रकारच्या त्रिकोणी रचना आपण बघणार आहोत.



वरील रचनेत गुलाबी शेवंतीची फुले व गुलाबी कार्नेशन वापरली आहेत. सोबत फर्नची पाने वापरुन ही रचना केली आहे. ही रचना करताना प्रथम त्रिकोणाची तीन टोके - तीन कार्नेशन लावून घेतली आहेत व नंतर मधल्या जागेत फुले लावून आकार पूर्ण केला आहे.



या रचनेत लाल गुलाब व लाल ॲन्थोरियम वापरले आहे. उभ्या व्हाजमध्ये ही रचना केली आहे. त्रिकोणाच्या प्रत्येक टोकाशी ॲन्थोरियम लावून मधल्या भागात गुलाब लावले आहेत. सोबत फर्नची पाने वापरली आहेत.

या रचनेत पामची मोठी तीन पाने वापरुन प्रथम हिरव्या रंगाचा त्रिकोणी आकार केला आहे व त्यामध्ये ग्लॅडिओलीची फुले वापरुन रचना पूर्ण केली आहे.



सौ. अरुंधती शिरीष देशपांडे
इकेनोबो इकेबाना, पुणे चॅप्टर
asdssd@gmail.com